आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

ठळक बातम्या

- अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर, पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला उपस्थित राहणार

- देशातल्या प्रसिद्ध पर्यटन स्थळांच्या विकासासाठी ३ हजार ३०० कोटींच्या ४० योजनांना केंद्राची मंजुरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यातल्या पर्यटन स्थळांचाही समावेश

- गोंदिया जिल्ह्यात शिवशाही बसला झालेल्या अपघातात १० जणांचा मृत्यू तर ३० जण जखमी

<><><><>

अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात आजही अडथळे निर्माण झाले. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज चौथ्या दिवशी देखील दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

आज सकाळी राज्यसभेचं कामकाज सुरु होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अदानी लाच प्रकरणाबाबत गदारोळ सुरु केला. विरोधी पक्षांच्या गोंधळामुळं राज्यसभेचं कामकाज अपेक्षेप्रमाणे होत नसल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यसभेचं कामकाज ठप्प झाल्यानं वेळेचा अपव्यय तसंच सामान्य जनतेच्या समस्यांची हेळसांड होत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून धनखड यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेच्या अधिवेशनाचं पुढचं सत्र आता २ डिसेंबरला होणार आहे.

लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर काँग्रेस, डीएमके आणि समाजवादी पार्टीच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी सुरु केली. या गदारोळातच सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराच्या तासावरची चर्चा सुरु ठेवली. मात्र विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दाद न दिल्यामुळे बिर्ला यांनी लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

<><><><>

दिल्लीत गुन्हेगारीच्या घटना वाढत असल्याचा आरोप करत आम आदमी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेबाहेर निदर्शनं केली. दिल्लीत वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी सरकारनं उपाययोजना कराव्यात असं पक्षाचे नेते संजय सिंह यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

तसंच पंजाबमधल्या काँग्रेस खासदारांनीही आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली. भारतीय अन्न महामंडळ किमान आधारभूत किमतीत पिकांची खरेदी करत नसल्याचा आरोप पंजाब काँग्रेसचे प्रमुख अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी केला.

त्यामुळे शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दरानं पिकांची विक्री करावी लागत आहे, असं त्यांनी यावेळी म्हटलं. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर आहेत. भुवनेश्वर इथं होत असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला ते उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. या तीन दिवसीय परिषदेला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह केंद्रीय राखीव पोलीस दल, रॉ, एनएसजी आणि गुप्तचर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत देशांतर्गत संरक्षण, नवीन गुन्हेगारी कायदे, किनारपट्टी संरक्षण, सायबर गुन्हे, माओवाद्यांची दहशत तसंच अद्ययावत तंत्रज्ञानामुळे उद्भवणाऱ्या समस्यांबाबत चर्चा होणार आहे. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर भुवनेश्वर सरकारनं कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे.

दरम्यान, देशातल्या युवकांना सर्वोच्च स्थानावर पोहचण्यासाठी आणि आपल्या कारकिर्दीत उत्कृष्ट प्रदर्शन करण्यासाठी सर्व आवश्यक संधी देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे. माय जी ओ व्ही हँडलवर त्यांनी हे आश्वासन दिलं. भारतीय तरुणांमध्ये कोणताही चमत्कार करण्याचं सामर्थ्य आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

राज्यात सरकार स्थापनेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी काल दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. सरकार स्थापनेसंदर्भात अनेक बाबींवर यावेळी चर्चा करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रांताध्यक्ष सुनिल तटकरे यावेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर फडणवीस यांनी समाज माध्यमावरुन राज्यात विधानसभा निवडणुकीत केलेल्या सहकार्याबद्दल शहा यांचे आभार मानले. पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रेरित करण्याचं काम शहा यांनी केल्याचं, फडणवीस यांनी म्हटलं आहे.
दरम्यान, ही बैठक अतिशय सकारात्मक झाली, यानंतर मुंबईत आणखी एक बैठक होणार आहे, त्यात मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

<><><><>

ईव्हीएम विरोधात कॉँग्रेसने केलेले आरोप हास्यास्पद असल्याची टीका भाजपाचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. देशभरात ईव्हीएमवर निवडणुका घेण्याचा निर्णय आणि ईव्हीएमची खरेदी कॉँग्रेसच्या कार्यकाळात करण्यात आली होती. तसंच आंदोलनाचा इशारा देण्यापूर्वी, देशभरात विविध निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या, सर्व लोकप्रतिनिधींनी राजीनामा दिल्यास, कॉँग्रेस याबाबत गंभीर असल्याचं आम्ही समजू, असंही ते म्हणाले. दरम्यान, नवीन सरकारचा शपथविधी सोहळा लवकरच होणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

केंद्र सरकारने देशातल्या प्रसिद्ध पर्यटन स्थळांना जागतिक मानकांनुसार विकसित करण्यासाठी सुमारे तीन हजार ३०० कोटी रुपयांच्या ४० योजनांना मंजुरी दिली आहे. २३ राज्यातल्या या योजनांसाठी राज्यांना विशेष मदत दिली जाईल, ज्यावर, पुढची ५० वर्षं कोणतंही व्याज आकारलं जाणार नाही. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात जलसंग्रहालय, कृत्रिम प्रवाळ निर्मिती प्रकल्पासाठी ४६ कोटी रुपये, तर नाशिक इथं रामकाल मार्गासाठी ९९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पर्यटनामध्ये अनेकांच्या जीवनात समृद्धी आणण्याची क्षमता असून, सरकार देशात पर्यटन पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर देत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मंदिरातल्या काही भागांचं जतन आणि संवर्धन, पुरातत्व विभागामार्फत करण्यात येणार असून मंदिर परिसरात ५८ कोटी रुपयांची विविध विकासकामं करण्यात येणार आहेत. पुजारी मंडळ आणि नागरिकांच्या काल झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. मंदिर, मंदिराचं महाद्वार ते देवीच्या गाभाऱ्यापर्यंत करण्यात येणारी विकास कामं, एकूण सहा टप्प्यात होणार आहेत.

<><><><>

गोंदिया जिल्ह्यात आज सकाळी शिवशाही बसला अपघात होऊन १० जणांचा मृत्यू झाला तर ३० जण जखमी झाले. ही बस भंडारा ते गोंदिया असा प्रवास करत होती. वाटेत सडक अर्जुनी मार्गावर बिंद्रावन टोला या गावानजीक चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस पलटली आणि हा अपघात झाला. पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने धाव घेत बचाव कार्य सुरू केलं असून जखमींना गोंदिया जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेतल्या जखमींना गरज पडल्यास खासगी रुग्णालयात दाखल करण्याचे किंवा नागपूरला हलवण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती फडणवीस यांनी आपल्या समाजमाध्यमावर दिली आहे.

<><><><>

राज्यात थंडीची कडाका वाढत असून बऱ्याचं ठिकाणी तापमानात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. परभणी जिल्ह्यात आज सर्वाधिक कमी ८ अं ्श सेल्सिअस तापमानाची नोंद, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागानं केली आहे. अमरावती शहरात देखील पारा १२ अंश सेल्सिअस पर्यंत तर धारणी-चिखलदऱ्यात पहाटे पारा ९ अं.से. पर्यंत घसरलाय. हवामान खात्यानं येत्या तीन दिवसात काही जिल्ह्यात थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे.

<><><><>

बंगालच्या उपसागराच्या नैर्ऋत्य भागात निर्माण झालेला, कमी दाबाचा पट्टा आज सकाळी वायव्य दिशेला सरकून नागपट्टीनम, पुदुचेरी आणि चेन्नई पर्यंत पोचला आहे. पुढच्या तीन तासात त्याचं रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून, त्याचा थेट परिणाम उद्या दुपारपर्यंत पुद्दुचेरीजवळ महाबलिपुरम, कराईकल या भागांवर होऊ शकतो . या दरम्यान ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वारे वाहतील, असंही हवामान विभागाने कळवलं आहे.

<><><><>

ओमानमध्ये मस्कत इथं पुरुषांच्या कनिष्ठ आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतानं जपानवर ३-२ अशा फरकानं विजय मिळवला. भारताचा अ गटातला हा सलग दुसरा विजय आहे. भारताचा पुढचा सामना उद्या तैवानशी होणार असून, रविवारी अंतिम सामन्यात भारताची लढत कोरियासोबत होणार आहे.

<><><><>

बॅडमिंटनमध्ये आज भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही सिंधूने लखनौमध्ये सैद मोदी इंडिया इंटरनॅशनल 2024 सुपर 300 स्पर्धेच्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

//<><><><>//